नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०८/२०२५ ( सोमवार )**

---

## कुही फाटयावरील हॉटेल रेस्पीरो येथे अवैधरित्या दारू विक्री आणि हुक्का पिण्यास उपलब्ध करून देणाऱ्या ४ आरोपीतांवर गुन्हा नोंद
## उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही :—** दिनांक १८/०८/२०२५ रोजी श्रीमती वृष्टि जैन, सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग उमरेड, जि. नागपुर ग्रामीण यांना गुप्त बातमीदाराने माहीती दिली की, पोलीस स्टेशन कुही अंतर्गत कुही फाटा येथील रेस्पीरो हॉटेल येथे हॉटेल मालक आणि मॅनेजर हे स्वत:च्या अर्थिक फायदयासाठी अवैधरित्या दारू तसेच हुक्का बाळगुन ग्राहकांना पिण्यास उपलब्ध करून देत आहे. अशी माहीती प्राप्त होताच श्रीमती वृष्टि जैन यांनी तात्काळ उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय उमरेड चे अंमलदार आणि कुही पोलीस स्टेशन चे अधिकारी तसेच अंमलदार यांचे पथक नेमुन पथकासह कुही फाटा येथील रेस्पीरो हॉटेल येथे पंचासमक्ष छापा टाकला असता तिथे आरोपी क्रं १) नामे सतीश तापेश्वर शर्मा, वय ३५ वर्ष, रा. प्लाट नं. ३५,तृप्तीनगर, बेलतरोडी नागपुर, (हॉटेल मॅनेजर) आणि २) सुनिल इंद्रबहादुर सिंग ठाकुर, वय ४७ वर्ष, रा. प्लाट, नं. ५६ मानेवाडा रिंगरोड, नागपुर (किचन मॅनेजर) हे मिळुन आले. पंचासमक्ष हॉटेलची झडती घेतली असता हॉटेल मध्ये टेबलवर अर्धवट भरलेली ब्लेंड २८५ सिग्नेचर १ लीटर ची बॉटल , टेबलवर १४ हुक्का पॉट ज्यामध्ये जीवंत अंगारे असलेले, हॉटेलचे किचन मध्ये एक दारूची पेटी ज्यामध्ये बॅलेनटाईन,ऑगर मास्टर लेबल अशी विदेशी दारू मिळुन आली. आरोपीला परवान्या बाबत विचारना केली असता त्यांचे कडे कोणताही परवाना नव्हता. आरोपी मॅनेजर ला सदर रेस्पीरो हॉटेल मालकाचे नाव पत्ता विचारले असता सदर हॉटेलचे मालक नामे ३) अमीतकुमार ओमप्रकाश रॉय, वय ४६ वर्ष, रा. नंदनवन,

नागपुर  आणि ४) राहुल कटकवार, रा. पारडी, नागपुर असुन यांच्या सांगण्याप्रमाणेच विनापरवाना दारू विक्री आणि अवैधरित्या हुक्का बाळगुन ग्राहकांना पिण्यास उपलब्ध करून देत असल्याबाबत माहीती समजली. पोलीसांनी पंचासमक्ष ब्लेंड २८५ सिग्नेचर १ लीटर ची बॉटल , १४ हुक्का पॉट प्रत्येकी १५००/— रू प्रमाणे एकुण २१०००/— रूपये, बॅलेनटाईन, ऑगर मास्टर लेबल विदेशी दारू आणि जुन्या वापरत्या खुर्च्या असा एकुण १,०२,६५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नमुद आरोपी यांचे विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, सह कलम ४ (क), २१(क) सिगारेट आणि ईतर तंबाखू उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन यांचे विनियमन) अधिनियम २००३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.



# कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत नागपुर ते जबलपुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील स्ट्रिट लाईट सुरू केल्या बाबत.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येत असलेल्या नागपूर जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर स्ट्रीट लाईट बंद असल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात होती. अपघाताच्या प्रमाणाला आळा बसावा तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून कन्हान पोलिसांनी नगर परिषद कन्हान व नगर पंचायत कांद्री यांना स्ट्रीट लाईट दुरूस्ती बाबत पत्रव्यवहार करून व पाठपुरावा करून गांधी चौक कन्हान ते टेकडी फाटा कांद्रीपर्यंत बंद असलेले स्ट्रीट लाईट दुरुस्त करून सुरू करण्यात आले आहेत. तसेच गुरुद्वारा जवळ बंदस्थितीत असलेल्या हायमास्क लाईटची दुरुस्ती करण्यात आली आहे. सध्या संपूर्ण लाईट नगरपरिषद करणार नगर पंचायत केंद्रीय यांच्यामार्फत ने सुरु करण्यात आले आहे.






## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक १७/०८/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की शिवमंदीर जवळ, कोहळी येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन धाड टाकुन आरोपी नामे १)आशिष विजय वानखेडे, वय ३२ वर्ष, रा. खापर्डे बगीचा प्रभाग, क्र ०२ रेल्वे स्टेशनचे बाजुला, अमरावती २) अविनाश निळंकठ झाडे, वय ३९ वर्ष,रा वार्ड क्र ०२, कोहळी ३) खुशाल प्रकाश बन्सुले, वय २० वर्ष , रा. कोहळी ४) शुभम ज्ञानेश्वर परवरकर, वय २७ वर्ष, दोघे रा. उबगी यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच पकडले. पाहीजे आरोपी नामे ५) गजु राउत, ६) प्रणय उर्फे गोलु कडु,७) अभिषेक लाड, ६) ललीता लिंगे, ९) चेतन ताजणे, १०) भुषण बन्सुले आणि ११) मुन्ना बागडे सर्व रा. कोहळी हे पोलीसांना पाहुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. मिळुन आलेल्या आरोपीतांच्या

ताब्यातुन ५२ तास पत्ते , रोख रक्कम ५६१०/— रूपये, १) तीन मोबाईल आणि सहा दुचाकी १) एक प्लसर मोटर सायकल क्रमांक एम.एच ४० ए. एन. ३६९९ २) स्पेलडर मोटार सायकल क्र एम.एच ४० एच १६३१ ३) स्पेलडर प्लस मोटार सायकल क्र एम.एच. ४० ए. एच. ८८९० ४) स्पेलडर मोटार सायकल क्र एम.क्र एम.एच. ३१.ए. आर. ६७६३ ५) सुझुकी ॲक्सेस मोपेड क्र एम.एच.२७ सी.एम .०६१२ ६) ॲक्टीवा क्र. एम.एच ३१ बी. डब्ल्यु. ३२५४ असा एकुण २,७५,६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १२ (अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री तसेच वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १७ गुन्हे नोंद एकुण ७८,४२२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक १७/०८/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, गुन्हयात वापरलेले वाहन असा एकुण ७८,४२२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी १) महेश नारायण मुत्तलवार, वय ४५ वर्ष, रा. शिवाजी ले आउट, भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर आणि २) संघपाल नारायण मेश्राम, रा. भगवानपुर, भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे मधुकर नथुजी कतलाम, रा. अनंतसावळी, काटोल, जि. नागपुर याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे प्रविण चूडामणजी वाघ, वय ५० वर्ष, रा. केळवद आणि एक महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे एक महीला आरोपी हीचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी १) राजुसिंग भवानीसिंग बावरी,वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, ब्राम्हणी, कळमेश्वर, २) दिलदारसिंग भगवानसिंग बावरी, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ मिरा पेट्रोल पंप जवळ ब्राम्हणी, ३) अजमेरसिंग धरमसिंग अंधरेला, वय ४८ वर्ष,रा. वार्ड क्र १५ कळमेश्वर, ४)

नुरसिंग धरमसिंग अंधरेले, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र १५ कळमेश्वर यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा आणि १) कपुरसिंग उजागगरसिंग अंधरेला, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र १५ कळमेश्वर २) दिनेश भोसले, रा. गोंडखैरी बरड यांचे वर १ गुन्हा असे ५ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १) आशिष निलकंठ महाजन, वय ३८ वर्षे, रा. नेहरू वार्ड रामटेक ता.रामटेक, २) किरण संतोष कारेमोरे, वय २५ वर्षे, रा. शितला माता मंदीर जवळ, आझाद वार्ड, रामटेक, ता. रामटेक आणि ३) सुर्यप्रकाश मोहन कठौते, वय ४१वर्षे, रा. वार्ड क्र. १ नगरधन ता. रामटेक यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) चंद्रकातं उर्फ चंदु हरीचंद निंदेकर, वय ३५ वर्ष, रा. रिधोरा २) दर्शनसिंग बावरी, रा सातगाव, ता. हिंगणा, जि. नागपुर यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे १) अल्ताब इंदल पुरवले, य ५० वर्षे, रा. एम.जी. नगर, तारसा रोड, कन्हान, ता. पारशिवनी २) सुर्या सुरज लोंढे, वय ३२ वर्षे, रा. वाघधरेवाडी, विष्णुलक्ष्मी नगर, पावर हाउस जवळ, कन्हान ता. पारशिवनी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १७ गुन्हे दाखल केले आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे स्वतंत्रदिनानिमित्य अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत करण्यात आली जनजागृती

दिनांक १७/०८/२०२५ रोजी स्वतंत्रदिनानिमित्याने अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत पोलीस स्टेशन कुही येथील भारत माता चौक, कुही येथे पोलीसांनी दहिहंडी निमित्याने जमलेल्या नागरिकांना अंमली पदार्थ विरोधी अभियाना अंतर्गत अंमली पदर्थ सेवनाचे/ व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम नुकसान यावर मार्गदर्शन केले. तसेच एमआयडीसी कुही येथील विविध कंपन्यामध्ये जावुन ,निरवा गावात जेष्ठ नागरीक आणि तरूण यांच्यासह गावातील नागरिकांची सभा घेवुन त्यांना अंमली पदर्थ सेवनाचे/ व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम तसेच शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले.




## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १७/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १८/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टि जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत उमरेड शहरात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये उमरेड पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने